
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार, 18 मार्च 2026 | अंक क्र. 299 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेला इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता

■ मुंबई वृत्तसंस्था

विदर्भातील नवउद्योग (स्टार्टअप) परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी त्यांच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरसाठी दोन दिवसीय धोरणात्मक कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत राज्यभरातील इन्क्यूबेशन सेंटर प्रमुख, शैक्षणिक संस्था तसेच परिसंस्थेतील विविध घटक सहभागी झाले. या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. यामुळे भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर यांना अधिकृतपणे महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली. या धोरणात्मक समावेशामुळे विदर्भातील नवोपक्रम, उद्योजकता आणि नवउद्योगांच्या वाढीस मोठी चालना मिळणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात मजबूत व सर्वसमावेशक नवउद्योग परिसंस्था उभारण्याबाबत शासनाची कटिबद्धता अधोरेखित केली. अशा संस्थात्मक सहकार्यांमुळे नवउद्योगांना योग्य मार्गदर्शन, साहाय्य व संधी उपलब्ध होऊन प्रादेशिक विकासास हातभार लागेल, असे त्यांनी नमूद केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी प्रारंभिक टप्प्यातील नवोपक्रमकर्त्यांना साहाय्य देण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढ महत्त्वाची असल्याचे सांगितले. जिल्हा व स्थानिक पातळीवर नवोपक्रम विकसित करण्यासाठी सक्षम इन्क्यूबेशन प्रणाली आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, राज्यात २९ सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरचे मजबूत जाळे उभे करण्यात आले असून ते नवउद्योगांना कल्पनांपासून विस्तारक्षम उपक्रमांपर्यंत पोहोचण्यास मदत करत आहेत. तसेच इन्क्यूबेशन सेंटरनी परस्पर ज्ञान, कौशल्य व संधींची देवाणघेवाण करत सहकार्यपूर्ण परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यशाळेत इन्क्यूबेशन पद्धती अधिक सक्षम करण्याबरोबरच दीर्घकालीन शाश्वततेवरही भर देण्यात आला. अटल नाविन्यता मिशनचे माजी संचालक आणि नीति आयोगाचे अतिरिक्त सचिव रमणन रमणाथन, आयएसबीएचे अध्यक्ष प्रसाद मेमन यांच्या सत्रांमध्ये इन्क्यूबेशन सेंटरची आर्थिक, कार्यात्मक व धोरणात्मक शाश्वतता सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या इन्क्यूबेशन केंद्रामध्ये नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचा समावेश झाल्यामुळे विदर्भातील नवउद्योजकांना मार्गदर्शन, उद्योगसाखळीशी जोडणी आणि नवोपक्रम साहाय्य अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे इच्छुक उद्योजकांसाठी नव्या संधी निर्माण होऊन महाराष्ट्राची देशातील अग्रगण्य नवउद्योग केंद्र म्हणून ओळख अधिक बळकट होणार आहे.







# भ्रष्टाचार प्रकरणात मोठी कारवाई : परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे निलंबित

■ परळी : प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्यावर भ्रष्टाचार प्रकरणात मोठी प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयाने यासंदर्भात अधिकृत आदेश काढले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, परळी शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात व्यंकटेश मुंडे यांना २० फेब्रुवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



सुनावली.

शासकीय नियमानुसार एखादा शासकीय अधिकारी ४८ तासांपेक्षा जास्त काळ न्यायालयीन अभिरक्षेत राहिल्यास त्याला निलंबित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार विभागीय आयुक्तांनी व्यंकटेश मुंडे यांना अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच २० फेब्रुवारी २०२६ पासून निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. निलंबन कालावधीत मुंडे यांचे मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे ठेवण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी किंवा व्यवसाय स्वीकारू नये, अन्यथा शिस्तभंगाची कारवाई होईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या कारवाईमुळे परळीच्या महसूल प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून संपूर्ण जिल्ह्यात या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.

# ‘महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक’ विधानपरिषदेत मंजूर

■ मुंबई वृत्तसंस्था

महाराष्ट्रात गेल्या काही काळापासून चर्चेत असलेले आणि अत्यंत कडक तरतुदी असलेले ‘महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६’ आता विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाले आहे. सोमवारी रात्री विधानसभेत या विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर, आज मंगळवारी विधान परिषदेतही त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रलोभन, धाक-दपटशहा किंवा विवाहाचे आमिष दाखवून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतरणाला पायबंद घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

बळजबरीच्या धर्मांतरासाठी कठोर दंड आणि शिक्षा या नवीन कायद्यानुसार, कोणत्याही व्यक्तीला फसवून किंवा 'दैवी चमत्कारांचा' बनाव रचून धर्मांतरित केल्यास संबंधितांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीमधील असेल, तर किमान ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल. विशेष म्हणजे, गुन्ह्याची पुनरावृत्ती करणाऱ्यांना थेट १० वर्षांच्या कठोर शिक्षेला सामोरे जावे लागेल.

**विवाह आणि धर्मांतर: महत्त्वाचे नियम**

या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे, केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह आता 'अवैध' (Null and Void) ठरवण्यात येणार आहेत. मात्र, अशा विवादास्पद विवाहातून जन्माला आलेल्या बालकांचे हित जपण्यासाठी त्यांना आई-वडिलांच्या मालमत्तेत पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत, तसेच अशा मुलांची कस्टडी आईकडेच राहील असे स्पष्ट करण्यात आले आहे. जर एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या इच्छेने (स्वेच्छेने) धर्म बदलायचा असेल, तर त्याला ६० दिवस आधी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना तशी रीतसर नोटीस देणे बंधनकारक असेल.

संस्थांवर टाच आणि तपासाचे स्वरूप

केवळ व्यक्तीच नव्हे, तर धर्मांतरासाठी प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांवरही सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. दुसऱ्या धर्माचा अपमान करून स्वतःच्या धर्माचे उदात्तीकरण करणे किंवा 'दैवी प्रकोपाची' भीती दाखवणे हा आता गुन्हा ठरेल. दोषी आढळणाऱ्या संस्थांची नोंदणी रद्द केली जाईल आणि त्यांचे सरकारी अनुदान कायमचे बंद करण्यात येईल. या प्रकरणांचा तपास किमान पोलीस उपनिरीक्षक (PSI) दर्जाचा अधिकारी करेल आणि याची सुनावणी थेट सत्र न्यायालयात (Sessions Court) होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, धर्मांतर बळजबरीने झालेले नाही, हे सिद्ध करण्याची कायदेशीर जबाबदारी आता आरोपीवर सोपवण्यात आली आहे. आज विधान परिषदेत 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६' वर चर्चा होताना सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी या कायद्याच्या आवश्यकतेवर भर दिला, तर विरोधकांनी काही तांत्रिक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले. विधेयक मांडताना गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, "हे विधेयक कोणत्याही विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून, केवळ फसवणूक, भीती आणि प्रलोभनाद्वारे होणाऱ्या 'सक्तीच्या' धर्मांतराला चाप लावण्यासाठी आहे. ज्यांना खरोखर स्वेच्छेने धर्मांतर करायचे आहे, त्यांच्यासाठी ६० दिवस आधी नोटीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता येईल.

### चित्रा वाघः "फसवणूक होणाऱ्या मुलींसाठी हा कायदा ढाल ठरेल"


**■ महिलांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या चित्रा वाघ यांनी या विधेयकाचे जोरदार स्वागत केले. "विवाहाचे आमिष दाखवून किंवा स्वतःचे नाव बदलून हिंदू मुलींची जी फसवणूक केली जाते, ती आता थांबेल. अनेक मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे सक्तीने धर्मांतर केले जाते, त्यांच्यासाठी हा कायदा एक संरक्षक ढाल ठरेल," असे त्या म्हणाल्या. तसेच, अशा विवादास्पद विवाहातून जन्मलेल्या मुलांच्या कस्टडीचा अधिकार आईला देणे आणि त्यांना वडिलांच्या मालमत्तेत हक्क देणे, हा महिलांना न्याय देणारा क्रांतीकारी निर्णय असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रसाद लाड यांनी प्रामुख्याने धर्मांतरासाठी वापरल्या जाणाऱ्या आर्थिक प्रलोभनांवर भाष्य केले. ते म्हणाले की, "काही संस्था परकीय निधीचा (Foreign Funding) गैरवापर करून गरीब आणि गरजू नागरिकांना पैसे किंवा मोफत शिक्षणाचे आमिष दाखवतात. अशा संस्थांची नोंदणी रद्द करून त्यांचे सरकारी अनुदान बंद करण्याची तरतूद करून सरकारने योग्य पाऊल उचलले आहे. धर्माचा अपमान करून किंवा 'दैवी प्रकोप' होईल अशी भीती घालून लोकांचे मन वळवणे, हा गंभीर गुन्हाच मानला जावा," अशी मागणी त्यांनी यावेळी केली.**

# रब्बी हंगामातील 'ई-पीक पाहणी'ला 31 मार्चपर्यंत मुदतवाढ

## ४५ टक्के शेतकरी अजूनही प्रक्रियेबाहेर; महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

■ मुंबई : वृत्तसंस्था

राज्यातील रब्बी हंगाम २०२५-२६ मधील 'ई-पीक पाहणी' करण्याची मुदत आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात येत असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधानसभेत केली.



बावनकुळे म्हणाले की, "२५ जानेवारी २०२६ पासून सहाय्यक स्तरावर ई-पीक पाहणीची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत रब्बी हंगामातील पिकांची केवळ ५५.६९ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ टक्के शेतकरी या नोंदणी प्रक्रियेपासून लांब आहेत. ही नोंदणी १०० टक्के पूर्ण व्हावी, या हेतूने सरकारने मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.पीक विम्यासह सरकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ई-पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे.”

जमाबंदी आयुक्त आणि कृषी आयुक्त यांनी समन्वयाने काम करून 'ॲग्री स्टॅक' मधील डेटाची नोंदणी तातडीने पूर्ण करावी," अशी सूचना प्रशासनाला केली असल्याचे सांगून बावनकुळे म्हणाले की, पीक पाहणीची पडताळणी अचूक आणि वेळेत व्हावी, यासाठी विशेष लक्ष दिले जाणार आहे.



# धर्मांविषयी भीती का निर्माण होते?

# एक सामाजिक विश्लेषण

जगातील सर्व धर्मांचा मूलभूत संदेश हा मानवतेचा, शांततेचा आणि नैतिकतेचा आहे. प्रत्येक धर्म माणसाला चांगले आचरण, परस्पर आदर आणि समाजकल्याण यांचा मार्ग दाखवतो. तरीही इतिहासात आणि आधुनिक समाजात कधी कधी काही धर्मांविषयी भीती, संशय किंवा पूर्वग्रह निर्माण झाल्याचे दिसते. एखाद्या धर्माबद्दल किंवा त्या धर्माच्या अनुयायांविषयी निर्माण होणाऱ्या अवास्तव भीतीला सामान्यतः "धर्मफोबिया" असे म्हटले जाते. ही घटना केवळ एका धर्मापुरती मर्यादित नसून जगातील विविध समाजांमध्ये वेगवेगळ्या काळात दिसून आलेली आहे. त्यामुळे या प्रश्नाचा विचार संतुलित आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे.

## अज्ञान आणि अपुरी माहिती:

धर्मांविषयी भीती निर्माण होण्यामागील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अज्ञान किंवा अपुरी माहिती. अनेकदा लोकांना इतर धर्मांच्या तत्त्वज्ञानाविषयी, परंपरांविषयी आणि जीवनमूल्यांविषयी पुरेशी माहिती नसते. परिणामी काही बाह्य गोष्टी पाहून त्या धर्माबद्दल चुकीचे निष्कर्ष काढले जातात. उदाहरणार्थ पोशाख, धार्मिक विधी, प्रथा किंवा सांस्कृतिक परंपरा वेगवेगळ्या असू शकतात. परंतु त्या मागील तत्त्वज्ञान समजून घेतल्यास त्या गोष्टींचा अर्थ स्पष्ट होतो. योग्य माहितीचा अभाव असताना गैरसमज वाढण्याची शक्यता अधिक असते.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी:

मानवी इतिहासात विविध समाजांमध्ये अनेक संघर्ष घडले आहेत. काही संघर्ष धार्मिक कारणांमुळे झाले असे मानले जाते, तर अनेक संघर्ष राजकीय किंवा आर्थिक कारणांमुळे झाले असून त्यांना धार्मिक रंग दिला गेला. अशा घटनांमुळे काही समाजांच्या सामूहिक स्मरणात विशिष्ट धर्मांविषयी अविश्वास निर्माण होऊ शकतो. परंतु इतिहासातील घटनांचे विश्लेषण करताना त्या काळातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक असते.

## राजकीय आणि सामाजिक स्वार्थ:

काही वेळा राजकीय स्पर्धेमध्ये धर्माचा वापर भावनात्मक मुद्दा म्हणून केला जातो. समाजातील लोकांना एकत्र आणण्यासाठी किंवा विभाजन निर्माण करण्यासाठी धार्मिक ओळख वापरली जाते. यामुळे समाजात संशय, तणाव आणि भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. त्यामुळे समाजशास्त्रज्ञांच्या मते धर्मांविषयी निर्माण होणाऱ्या भीतीचा संबंध अनेकदा राजकीय आणि सामाजिक प्रक्रियांशी जोडलेला असतो.

## माध्यमांचा प्रभाव:

आधुनिक काळात माध्यमे समाजाच्या विचारांवर



**डॉ. सुवर्णा कराड**
**प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र राज्य**

मोठा प्रभाव टाकतात. दूरदर्शन, वृत्तपत्रे, चित्रपट आणि सामाजिक माध्यमे यांमधून समाजातील विविध विषयांवर चर्चा घडते. परंतु काही वेळा एखाद्या धर्माशी संबंधित नकारात्मक घटना अधिक ठळकपणे दाखवल्या जातात. त्यामुळे त्या धर्माची एकतर्फी प्रतिमा तयार होऊ शकते. वस्तुतः कोणत्याही समाजात सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारच्या घटना घडतात. त्यामुळे माध्यमांनी संतुलित आणि जबाबदारीने माहिती देणे आवश्यक आहे.

## सांस्कृतिक भिन्नता आणि जागतिकीकरण:

जागतिकीकरणामुळे विविध संस्कृती आणि धर्मांचे लोक एकमेकांच्या अधिक जवळ आले आहेत. स्थलांतर, शिक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान यांमुळे विविध समाजांमधील संपर्क वाढला आहे. या संपर्कामुळे परस्पर समज वाढण्याची संधी मिळते, परंतु कधी कधी सांस्कृतिक भिन्नतेमुळे गैरसमजही निर्माण होऊ शकतात. त्यामुळे विविध संस्कृतींच्या लोकांमध्ये संवाद आणि समज वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.

## अफवा आणि चुकीची माहिती:

सामाजिक माध्यमांच्या युगात माहिती अतिशय वेगाने पसरते. परंतु त्याचबरोबर चुकीची किंवा अपूर्ण माहितीही मोठ्या प्रमाणावर प्रसारित होते. अनेकदा काही संदेश, व्हिडिओ किंवा अफवा लोकांमध्ये भीती आणि संशय निर्माण करतात. माहितीची सत्यता तपासल्याशिवाय तिच्यावर विश्वास ठेवणे ही मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे माहितीचा विवेकपूर्ण वापर करणे ही आजच्या समाजाची गरज आहे.

## धर्मांचा मूलभूत संदेश:

जगातील सर्व प्रमुख धर्मांचा अभ्यास केला असता हे दिसून येते की सर्व धर्म मानवतेचा, दयाळूपणाचा, नैतिकतेचा आणि शांततेचा संदेश देतात. न्याय, सहिष्णुता, परस्पर आदर आणि समाजकल्याण ही मूल्ये सर्व धर्मांमध्ये आढळतात. त्यामुळे कोणत्याही धर्माविषयी भीती किंवा द्वेष निर्माण करण्याऐवजी त्या धर्माच्या मूलभूत शिकवणीचा अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे आहे.

## भारतीय समाजाचा दृष्टिकोन:

भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृती असलेला देश आहे. भारतीय समाजात दीर्घकाळापासून "सर्व धर्म समभाव" ही संकल्पना महत्त्वाची मानली गेली आहे. विविध धार्मिक परंपरा असूनही समाजात सहअस्तित्वाची परंपरा दिसून येते. त्यामुळे विविधतेचा आदर आणि परस्पर सहिष्णुता ही भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये मानली जातात.

एकूणच, धर्मांविषयी भीती निर्माण होण्यामागे अज्ञान, ऐतिहासिक अनुभव, सामाजिक परिस्थिती, माध्यमांचा प्रभाव आणि राजकीय घटक यांसारखी अनेक कारणे असू शकतात. परंतु कोणत्याही धर्माचा मूलभूत उद्देश मानवकल्याण आणि नैतिक जीवन हा असतो. त्यामुळे समाजात परस्पर आदर, संवाद आणि वस्तुनिष्ठ माहिती यांना महत्त्व दिल्यास धर्मांविषयीचे गैरसमज कमी होऊ शकतात. विविध धर्मांचा आदर राखत सहअस्तित्वाची भावना वाढवणे हीच आजच्या जागतिक समाजाची खरी गरज आहे. टीप : या लेखाचा उद्देश कोणत्याही धर्माची टीका करणे नसून धर्मांविषयी निर्माण होणाऱ्या सामाजिक भीतीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा आहे.

# लोकमानस

# मुलखांवेगळी माणस :

# सहा वर्षांच्या ज्ञानवीचं इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव

वयाच्या अडीच वर्षांपासून आतापर्यंत तीन वेळा वेगवेगळे रेकॉर्ड करणाऱ्या आणि दुसरीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने आपल्या आईवडिलांनी दिलेल्या अनोख्या युक्तीमुळे यश प्राप्त केलंय. सोप्या युक्ती वापरून ठाण्यातील या विद्यार्थिनीनं आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर कुशल पद्धतीनं पाने वाचून लक्षात ठेवता येतात हा संदेश इतर विद्यार्थ्यांना दिलाय. मूर्ती लहान पण कीर्ती महान असलेल्या मुलीनं ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलाय. 6 वर्ष 10 महिन्यांची ज्ञानवी वानरे ह्या चिमुकलीने भारताच्या संविधानाच्या 131 कलमांची माहिती देऊन एक नवा विक्रम तिच्या नावावर नोंदवलाय.

ठाण्यातील कोपरी पूर्व परिसरात ज्ञानवी आईवडील यांच्यासह राहते. अनोखे रेकॉर्ड बनवणाऱ्या ठाण्यातील आणि देशातील विद्यार्थ्यांमध्ये ठाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलाय, 7 वर्षीय ज्ञानवी वानरे ह्या चिमुकलीने भारताच्या संविधानाच्या कलमांची माहिती देऊन एक नवा विक्रम तिच्या नावावर नोंदवलाय. ठाण्यातील कोपरी पूर्व परिसरात राहणाऱ्या वानरे कुटुंबांची ज्ञानवी ही आपल्या आईच्या मदतीने आईच्या अभ्यासात असलेले संविधान आणि त्याच्या अभ्यासातून ऐकून हा नवा विक्रम तिने रचलाय.

ज्ञानवीच्या आई ह्या स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतात. अभ्यास करताना ज्ञानवीच्या कानावर आई काय वाचते हे शब्द पडतात आणि ते शब्द तिच्या लक्षात राहतात. ज्ञानवीला 100 हून अधिक देशांचे ध्वज ओळखता येतात, याशिवाय तिला योगाचा छंद आहे. ज्ञानवीने वयाच्या अडीच वर्षी योगासनामुळे पहिला रेकॉर्ड केला होता, ज्यात तिने 48 योगासने आणि प्राणायामचे 10 प्रकार केले होते. एवढ्या लहान वयात केलेल्या या कृतीची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झालीय. दुसरा रेकॉर्ड हा अवघ्या तीन वर्षांची असताना जगातील सर्व देशांचे झेंडे सांगण्याबाबत झाला होता. लहान मुले आईवडिलांचे अनुकरण करीत असतात, त्यामुळे सर्वच पालक याबाबत चांगले संस्कार देण्याचा प्रयत्न करतात. मात्र ज्ञानवीच्या बाबतीत




अभ्यास हादेखील आईमुळे होतोय, तिच्या सोबत अभ्यास करून आपल्या चांगल्या एकाग्र शक्तीचा फायदा ज्ञानवी हिला आयुष्यभर होणार आहे, सोबत शिक्षणाच्या चांगल्या संधी मिळून तिचे भविष्य देखील सुखकर होणार आहे.ज्ञानवी हिला सध्या अस्तित्वात असलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अभ्यास चांगल्या रीतीने करता येऊ शकतो. भल्या भल्या हुशार मुलांना हा अभ्यास कठीण वाटतो, एवढेच नाहीतर दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. मात्र त्यात यशस्वी होत नाहीत, पण ज्ञानवीला या अभ्यासाची आवड निर्माण झाली असून, तिची पूर्वतयारी तर सुरूच आहे.

# असा लागला शोध : कॅमेरा

कॅमेऱ्याचा शोध १८१६ मध्ये फ्रेंच नागरिक जोसेफ निकेफोर निएप्से यांनी लावला, ज्यांनी पहिला फोटोग्राफिक कॅमेरा तयार केला .हा शोध "कॅमेरा ऑब्स्क्युरा" नावाच्या प्राचीन, काळोख्या खोलीच्या तत्त्वावर आधारित होता, जो प्रकाशाच्या साहाय्याने प्रतिमा टिपतो क्यामेऱ्यायात एका लहान छिद्रातून प्रकाश येऊन समोरच्या भिंतीवर बाहेरील दृश्याची उलट प्रतिमा पडत असे जोसेफ निएप्से यांनी १८२६ (काही नोंदींनुसार १८१६ किंवा १८२७) मध्ये काचेच्या प्लेटवर पहिला स्थायी फोटो टिपला १६ व्या शतकात कॅमेरा ऑब्स्क्युरामध्ये 'बायकोनव्हेक्स लेन्स' जोडून प्रतिमा अधिक स्पष्ट आणि उजळ बनवण्यात आली निएप्से यांच्या प्रयत्नानंतर, फोटो जतन करण्याची प्रक्रिया विकसित झाली, ज्यामुळे पुढे फिल्म कॅमेरे आणि आजचे डिजिटल कॅमेरे अस्तित्वात आले थोडक्यात, शतकानुशतकांच्या प्रकाशाच्या अभ्यासातून आणि कॅमेरा ऑब्स्क्युराच्या तत्त्वावर, जोसेफ निएप्से यांनी १८ व्या शतकाच्या सुरुवातीला आधुनिक फोटोग्राफीची पायाभरणी केली




# चलती का नाम गाडी

## सुझुकी मोटरसायकल आता पर्ल ग्रेस व्हाइट रंगात

सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसएमआयपीएल) ने सुझुकी बर्गमन स्ट्रीट एक्ससाठी पर्ल ग्रेस व्हाइट हा नवीन रंग पर्याय सादर करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे स्कूटरमध्ये एक नवीन आकर्षण निर्माण झाले आहे.या सादरीकरणासह, सुझुकी बर्गमन स्ट्रीट एक्स आता तीन रंग पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: पर्ल ग्रेस व्हाइट (नवीन), मेटॅलिक रॉयल ब्रॉन्झ आणि मेटॅलिक मॅट ब्लॅक नंबर २, जे ग्राहकांना त्यांच्या शैली आणि पसंतीनुसार विस्तृत पर्याय प्रदान करते.याविषयी बोलताना, श्री दीपक मुत्रेजा, उपाध्यक्ष, विक्री आणि विपणन, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लिमिटेडने म्हटले आहे की, "बर्गमन स्ट्रीट EX ची विशिष्ट डिझाइन, प्रगत तंत्रज्ञान आणि त्याच्या विस्तारित रायडिंग पोझिशनमधील आरामदायी आरामदायी मिश्रणासाठी प्रशंसा झाली आहे. या नवीन अपडेटसह, आम्ही सुझुकीशी ग्राहकांनी जोडलेल्या विश्वासार्ह गुणवत्तेचे आणि विश्वासार्हतेचे पालन करत तिचे एकूण आकर्षण आणखी



वाढवतो."

ऑल-ॲल्युमिनियम १२४ सीसी, ४-स्ट्रोक, सिंगल सिलेंडर इंजिनद्वारे समर्थित, सुझुकी बर्गमन स्ट्रीट EX ६,५०० आरपीएमवर ८.६ पीएस पॉवर आणि ५,५०० आरपीएमवर १० एनएम टॉर्क देते. हे इंजिनची कार्यक्षमता खराब न होता एक नितळ रायडिंग अनुभव प्रदान करते. स्कूटरमध्ये सुझुकी इको परफॉर्मन्स अल्फा इंजिन तंत्रज्ञान आहे.

**संकलन संयोजन : सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# संपादकीय

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारीतून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकांना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही. सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत.

## गुढीपाडवा : संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक.



फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते. फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य. हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे. हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला "गुढीपाडवा"सण साजरा करतो.आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते.गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे.अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे.या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो. कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दु:ख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे.आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो. गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते. महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार)**

## दारावती तांडा येथे आ.धनंजय मुंडे व मा जि. प. गटनेते अजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्युत रोहित्र (डी.पी.) बसविले -वीजचे कायमचा प्रश्न लावला मार्गी ; ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी मानले आभार

**■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**





परळी शहरापासून काही अंतरावर असणारे दारावती तांडा ह्या गावातील विजेचा प्रश्न भेडसावत होता. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे व. मा. जि. प. गटनेते अजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील विजेचा प्रश्न त्यांना माहिती दिली असता तात्काळ रोहित्र (डी. पी) बसून देऊन विजेचा प्रश्न कायमचा मिटविल्याबद्दल आ.धनंजय मुंडे व मा जि. प. गटनेते अजय मुंडे यांचे ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी आभार मानले आहेत.

दारावती तांडा येथे लोकसंख्या जास्त असल्यामुळे आणखी एक रोहित्रची गरज होती. त्यामुळे विजेचा प्रश्न वारंवार येत होता. अनेक वर्षांपासून कमी-जास्त व्होल्टेजमुळे फ्रीज, टीव्ही यांसारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळण्याच्या घटना वारंवार घडत होत्या. त्यामुळे या भागातील नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले होते. या समस्येची दखल घेत राज्याचे माजी मंत्री तथा परळीचे लोकप्रिय आमदार धनंजयजी मुंडे व मा. जि. प. गटनेते अजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिसरात नवीन रोहित्र (डी.पी) बसविण्यात आल्यामुळे आता कायमच हा प्रश्न मिटला आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. ग्रुप ग्रामपंचायत लमान तांडा सरपंच विजय राठोड उपसरपंच कुडलिक जाधव ग्रुप ग्रामपंचायत सदस्य राजकुमार विठ्ठल राठोड रमेश पवार यमुनाबाई सुग्रीव पवार प्रेमदास पवार व ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अखेर हा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला आहे. नवीन रोहित्र डीपी व ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन पार पडले. नवीन रोहित्र (डी.पी) उभारणीमुळे परिसरातील वीज व्होल्टेजची समस्या दूर होणार असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच विजेचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आ.धनंजय मुंडे व मा जि. प. गटनेते अजय मुंडे व सरपंच विजय राठोड यांचे ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी आभार मानले आहेत. विजेचा पुरवठा अधिक सुरळीत होईल, विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेला असल्याची प्रतिक्रिया ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी दिली.

## सांगली जि.प.च्या वतीने पहिली दुसरीची गुणवत्ता शोध चाचणी

### पहिलीच्या १५२७७ आणि दुसरीच्या १६८५६ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**■ शिराळा/ प्रतिनिधी**





सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी गुणवत्ता शोध चाचणी परीक्षा दिनांक १६ मार्च रोजी जिल्ह्यातील २६८ परीक्षा केंद्रावर घेण्यात आली असून या परीक्षा पारदर्शीपणे आणि उत्साहात पार पडल्या असल्याची माहिती सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी दिली.

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या स्वीय निधीतून घेण्यात आल्या असून या परीक्षेस जिल्हा परिषदेच्या सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळातील विद्यार्थी बसले होते. या चाचणीसाठी इयत्ता पहिलीचे १६८२७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.२४५ अतिरिक्त विद्यार्थी परीक्षेत बसले होते. एकूण १७०७२ विद्यार्थी परीक्षेसाठी नोंदवले गेले. त्यापैकी१५२७७ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेस उपस्थित राहिले. तर १७९५ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. १३४ परीक्षा केंद्रावर त्यांची परीक्षा घेण्यात आली.

इयत्ता दुसरीच्या गुणवत्ता शोध चाचणीस जिल्ह्यातून १८३१७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.२९७ अतिरिक्त विद्यार्थी परीक्षेस बसले. एकूण १८६१४ विद्यार्थी परीक्षेसाठी नोंदले गेले. त्यापैकी १६८५६ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित राहिले. तर १७५८ एवढे विद्यार्थी परीक्षेसाठी अनुपस्थित राहिले. जिल्ह्यातील १३४ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा घेण्यात आली.

सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षा पारदर्शीपणे आणि चोख व्यवस्थेत, उत्साहात संपन्न झाल्या. उपशिक्षणाधिकारी नागेश ठोंबरे, जिल्ह्याचे शिक्षण विस्तार अधिकारी, प्रत्येक तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, समग्र शिक्षाचे अधिकारी, कर्मचारी यांनी विविध ठिकाणी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. इयत्ता पहिली आणि दुसरीच्या गुणवत्ता शोध चाचणीचा अंतिम निकाल आणि जिल्ह्याची गुणवत्ता यादी लवकरच घोषित केली जाणार आहे. या माध्यमातून सांगली जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी राष्ट्रीय राज्य जिल्हा गुणवत्ता यादीत चमकतील यासाठी तालुका आणि जिल्हा स्तरावरून विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

## 58 व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे

सध्या महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव असलेले श्री विकास खारगे यांचा माझा पहिला परिचय 26 वर्षांपूर्वी झाला. तेव्हा ते यवतमाळ येथे जिल्हाधिकारी होते. तत्पूर्वी ते जेव्हा आयएएस झाले तेव्हाही त्यांच्या बातम्या मी वर्तमानपत्रांमध्ये वाचल्या होत्या. सर्वसामान्य परिस्थितीतील श्री विकास खारगे यांनी आयएएस या परीक्षेमध्ये दैदीप्यमान यश संपादन करून आतापर्यंत अतिशय समृद्ध अशी वाटचाल केलेली आहे.

12 मे 2000 रोजी आमच्या अमरावतीच्या डॉ. पंजाबराव देशमुख आयएस अकादमीच्या मिशन आयएएस या प्रकल्पाचे उद्घाटन श्री विकास खारगे यांच्या हस्ते अमरावतीच्या विद्यापीठा जवळील विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या दंत महाविद्यालयात संपन्न झाले. तेव्हापासून तर आतापर्यंत त्यांचे माझे ऋणानुबंध कायम होते आहेत आणि राहतील.

विदर्भातील मुले बहुसंख्येने प्रशासनात जावीत यासाठी आम्ही आताचे आयकर आयुक्त श्री अभिनय कुंभार यांच्या मार्गदर्शनाने डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीची स्थापना केली .त्यांची भेट झाली नसती तर कदाचित ही अकादमी उभी राहिली नसती. उदघाटनाच्या कार्यक्रमाला श्री विकास खारगे हे आले. विशेष म्हणजे माझ्या घरी खाली जमिनीवर बसून त्यांनी जेवण केले. एक आय ए एस अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांनी जेव्हा एखाद्या अपरिचित घरी जमिनीवर बसून जेवण केले तेव्हा तो माणूस सर्वसामान्य माणसाच्या मदतीला धावणारा असतो हे समीकरण ठरून गेले आहे आणि त्याला श्री विकास खारगे हे पात्र ठरले आहेत.

साहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशासनामध्ये स्वतःची अमीट अशी छाप त्यांनी रुजविली आहे. सर्व सनदी अधिकाऱ्यांमध्ये व राजकीय नेत्यांमध्ये श्री विकास खारगे यांचे नाव आदराने सन्मानाने घेतले जाते .साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही तत्व प्रणाली त्यांनी आपल्या जीवनामध्ये प्रत्यक्ष उतरविली आहे .खरं म्हणजे हे कठीणच काम असते .पण ही तारेवरची कसरत खारगेसाहेबांनी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

साहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना केव्हाही एसएमएस करा. सर मला ताबडतोब उत्तर देतात. मग अगदी तो रात्री बारा वाजता अतिशय महत्त्वाच्या कामासाठी केलेला असला तरी.

परवा मी साहेबांना एक छोटेसे काम सांगितले. काम खूपच लहान होते .पण ते साहेबच करू शकत होते. साहेबांनी ते काम केले आणि मला सांगितले माझ्या वडिलांचे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. त्याचे पीडीएफ फाईल तुमच्याकडे पाठवीत आहे. त्यांच्या वडिलांचा 96 वा वाढदिवस नुकताच कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजीला साजरा झाला होता. साहेबांनी मला ते पुस्तक पाठवगले .मी ते लगेच वाचून काढले आणि मला त्यांच्या वडिलांना श्री शंकरराव खारगे यांना भेटण्याची इच्छा निर्माण झाली. यापूर्वी त्यांना मी भेटलो होतो .पण पुस्तक वाचून माझा आदर अजून वाढला आणि या माणसाला आपण ताबडतोब भेटले पाहिजे असे मी ठरविले. त्याप्रमाणे परवा मी इचलकरंजीला साहेबांच्या घरी जाऊन आलो.

साहेबांच्या वडिलांना भेटलो. 96 व्या वर्षी देखील ते बाहेर व्हरांडात पुस्तक वाचत बसले होते. मागे पासपोर्ट मॅन डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी माझे त्या इचलकरंजी भागात कार्यक्रम ठेवले तेव्हा देखील मी खारगे साहेबांकडे गेलो तर त्यांचे वडील तेव्हा देखील पुस्तकच वाचत होते.

मुख्य सचिवांचे घर किती साधे असू शकते याचे एकमेव उदाहरण म्हणजे श्री विकास खारगे हे आहेत. मलाच नवल वाटले. साहेब महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव आहेत. पण सर्वसामान्य माणसे जसे राहतात तसे त्यांचं घर आहे. या घराला अजून तरी अपर मुख्य सचिव या पदाचा अहंकारी स्पर्श झालेला नाही. हातमागासाठी लागणारे यंत्र तसेच हातमागासाठी लागलेले रोल व इतर साहित्य घराच्या आजूबाजूला आहे. अगदी साधे शेतकऱ्याचे घर शोभावे असे त्यांचे घर मी टिपले.

वडिलांचे 96 वय झाले तरी ते चालू शकतात. फिरू शकतात. ऐकू शकतात .फोन करू शकतात .स्वतःहून उठू शकतात मोटरसायकल बसू शकतात. मला वाटते या कुटुंबाने आपल्या प्रारंभिक अवस्थेमध्ये जे संघर्षमय जीवन कंठले आहे आणि त्यामुळे त्यांच्या जो पाया मजबूत झाला तो आजही खंबीर आहे आणि राहणारही आहे.

मी इचलकरंजीला जाणार आहे हे साहेबांना कळविले होते. माझ्या स्वागतासाठी त्यांचे बंधू पनवेलवरून इचलकरंजीला आले आणि त्यांनी मला विनंती केली की सर अगोदर मला पोहचू द्या नंतर आपण या. मी सांगलीला आमचे सन्मित्र व सनदी अधिकारी श्री विशाल नरवाडे यांच्याकडे थांबलो. त्यांनीच माझे इचलकरंजीला नेण्या-



आणण्याची व्यवस्था केली. खारगेसाहेबांचे घर पाहून वडील पाहून भाऊ पाहून आणि त्यांच्या मनात माझ्याविषयी असलेली आत्मीयता जिव्हाळा प्रेम पाहून मलाच गहिवरून आले. खरं आज अशी माणसं दुर्मिळ झालेली आहेत. पण ही माणसे मला इचलकरंजीला खारगे परिवाराच्या निमित्ताने प्राप्त झाली.

साहेब वेगवेगळ्या पदावर गेले. पण प्रत्येक वेळेस ते त्यांचे नंबर मला कळवीत गेले. अमरावतीला आले की ते आवर्जून मला फोन करीत होते आणि आजही करतात. आजच त्यांचा सकाळी फोन येऊन गेला. माझे जावई कर्नल सारंग व कन्या डॉ.प्राची ऑपरेशन सिंदूरनंतर राजस्थानवरून अमरावतीला माझ्याकडे आलेले. त्या गडबडीत मी तो फोन घ्यायला विसरलो. रात्री माझ्या लक्षात आले. मी लगेच साहेबांना फोन केला. अपर मुख्य सचिवांचा फोन बारा तास न उचलणे हेच मला बरेचसे बोचत होते. साहेबांशी बोलणे झाले .साहेबांनी कोणतीही तक्रार केली नाही. उलट माझ्या मुलीची व कर्नल जावयांची आस्थेने चौकशी केली. याला म्हणतात विनयशीलता.

खारगेसाहेबांचे एक अजून वैशिष्ट्य हे आहे की ते दरवर्षी गांधी जयंतीला आणि गांधी पुण्यतिथीला स्वतःसाठी खादीचे कपडे खरेदी करतात. आजकाल सर्वत्र फॅशन आलेल्या आहेत. मोठमोठ्या ब्रँडेड कंपन्यांची वस्त्रे परिधान करण्याची शर्यत लागली आहे. या शर्यतीत मात्र खारगेसाहेब नाहीत. खादीच्या कपड्यामुळे त्यांना जे समाधान मिळते ते मला असं वाटते ब्रँडेड कंपन्यांच्या वस्त्रांमध्ये नाही.

साहेबांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते बासरी वाजवितात. बासरीचे सुर हे नेहमी सौम्यच असतात .कधीही कर्कश होत नाहीत आणि त्यामुळेच की काय खारगेसाहेबांनी वाजविण्यासाठी बासरी हे वाद्य निवडले आहे. त्यांना जेव्हा केव्हा सवड मिळते तेव्हा ते बासरी वाजवितात आणि सोशल मीडियावरही टाकतात.


मागे जेव्हा उत्तराखंडमध्ये ढगफुटी झाली तेव्हा तिथल्या महाराष्ट्रीयन लोकांच्या मदतीसाठी महाराष्ट्र सरकारने जर कोणाची निवड केली असेल तर ती विकास खारगे यांची. इतक्या विपरीत परिस्थितीमध्ये ते उत्तराखंडला गेले. त्यांनी महाराष्ट्रीयन पर्यटकांची इतकी सुंदर व्यवस्था केली आणि त्या सर्वांना सुखरूप महाराष्ट्रात आणले त्यामुळे महाराष्ट्र शासनाने त्यांच्या परत मुंबईला आल्यानंतर गौरव केला.

साहेबांचा मुलगा मनीष आज सोशल मीडियावर खूप नावलौकिक मिळवित आहे. फक्त एक दोन मिनिटाचे व्हिडिओ त्याचे जगभरात पोहोचले आहेत. सरांचे दोन्ही चिरंजीव मी सरांना जेव्हा त्यांच्या यवतमाळच्या बंगल्यात भेटलो तेव्हा खूपच लहान होते. आता तर 26 वर्षाचा कालखंड निघून गेला आहे. मी नियमितपणे सरांना मुलांना वाढदिवसाचे पत्र पाठवितो.खारगेसाहेब म्हणतात काठोळे तुम्ही एकमेव असे मित्र आहात की मला न चुकता अभिनंदन करता.

चांगल्या माणसांचे नेहमी गुणगानच करायचे असते. आणि त्यासाठी श्री विकास खारगे हे पात्र आहेत हे वेगळे सांगणे न लगेच. सर्वसामान्य परिस्थितीतून आलेला हा माणूस आज महाराष्ट्राच्या अपर मुख्य सचिवपदापर्यंत पोहोचला आहे .त्यातच त्यांच्या यशाचे रहस्य दडलेले आहे. एवढ्या मोठ्या पदावर जाऊनही विनयशील बोलणे विनायशील वागणे तत्परतेने काम करणे रात्र असो वा दिवस असो सर्वसामान्य माणसाच्या मदतीला धावून जाणे हे काम ते अव्याहतपणे करीत असतात आणि करीत राहतील. अशा या विशाल हृदयाच्या माणसाला त्यांच्या 17 मार्चच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

**■ प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे संचालक मिशन आयएएस अमरावती कॅम्प महाराष्ट्र**

# समाधी महोत्सवासाठी जय्यत तयारी पूर्ण



■ आष्टी (प्रतिनिधी):

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, सावरगाव येथे होणाऱ्या 'नाथ संजीवन समाधी महोत्सव २०२६' निमित्त सध्या जय्यत तयारी करण्यात आली आहे. १४ मार्च ते १९ मार्च दरम्यान पार पडणाऱ्या या भव्य धार्मिक सोहळ्यासाठी देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी एकत्र येत सर्व आवश्यक व्यवस्था पूर्ण केल्या आहेत. महोत्सवादरम्यान देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांच्या सोयीसाठी निवास, पिण्याचे पाणी, वाहतूक, आरोग्य सेवा तसेच सुरक्षा व्यवस्थेची काटेकोर तयारी करण्यात आली आहे. मंदिर परिसराची स्वच्छता, सजावट व प्रकाशयोजना करण्यात आली असून, गड परिसर भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे.

महोत्सवातील प्रमुख धार्मिक कार्यक्रमांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. निशाण प्रस्थान, कावड आगमन, महाआरती, जलाभिषेक व महापूजा या विधी सुरळीत पार पडावेत यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी मार्गदर्शन केंद्रही उभारण्यात आले आहेत. देवस्थान ट्रस्टकडून भाविकांना शिस्त पाळण्याचे, स्वच्छता राखण्याचे तसेच प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः कावडधारकांसाठी वेळेचे नियोजन करण्यात आले असून, सर्वांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. एकूणच, सावरगाव येथे होणाऱ्या या 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'साठी जय्यत तयारी पूर्ण झाली असून, भक्तिमय वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## सावरगाव येथे 'नाथ संजीवन समाधी महोत्सवा'ची लगबग; भाविकांच्या स्वागतासाठी सर्व व्यवस्था सज्ज

# गॅस टंचाईचा लहान व्यावसायिकांना मोठा फटका;
## (जिल्हाधिकाऱ्यांनी मदतीचा हात द्यावा - जगदीश नरवाडे यांची आर्त हाक)

■ महागाव प्रतिनिधी

सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचे सावट आता स्थानिक बाजारपेठेवर दिसू लागले आहे. याचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील लहान हॉटेल व्यावसायिक, खानावळ चालक आणि नाश्ता विक्रेत्यांना बसत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत, 'जन आंदोलन आधार संघर्ष समिती'चे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे या व्यावसायिकांना विशेष सवलत व सुरळीत गॅस पुरवठा करण्याची मागणी केली आहे.

फुटपाथवर किंवा छोट्या गाळ्यांमध्ये अल्प दरात सर्वसामान्यांना भोजन आणि नाश्ता उपलब्ध करून देणारे व्यावसायिक सध्या मोठ्या संकटात आहेत. गॅस सिलिंडर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेकांचे व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. हे व्यावसायिक केवळ स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत नाहीत, तर मजूर आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या हजारो नागरिकांना परवडणाऱ्या दरात अन्न पुरवण्याचे महत्त्वाचे काम करतात.

जगदीश नरवाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, हे छोटे व्यावसायिक अत्यंत कष्टाने आपला प्रपंच चालवत आहेत. अशा कठीण काळात प्रशासनाने त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई न करता, त्यांना 'विशेष बाब' म्हणून प्राधान्याने गॅस पुरवठा करावा.

गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या या संकटामुळे सामान्य नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण



आहे. जर हे छोटे व्यवसाय बंद पडले, तर रोज बाहेर जेवण करणाऱ्या कामगार वर्गाचे हाल होतील.हे टाळण्यासाठी प्रशासनाने लहान खाद्य व्यावसायिकांना प्राधान्याने गॅस सिलिंडर उपलब्ध

> मोठ मोठ्या हॉटेल्सच्या महागड्या दरांपेक्षा हे छोटे व्यावसायिक सर्व सामान्य नागरिकांना परवडेल अशा दरात नाष्टा,जेवण उपलब्ध करून देत एकप्रकारे ते समाजाची सेवा करत आहेत. हजारो नागरिकांच्या भोजनाची सोय त्यांच्यामुळे होते. त्यामुळे प्रशासनाने त्यांना पाठीशी घालणे आणि गॅस पुरवठा सुरळीत करणे ही काळाची गरज आहे.
> **- जगदीश नरवाडे** (संस्थापक अध्यक्ष, जन आंदोलन आधार संघर्ष समिती)

करून द्यावेत.टंचाईच्या काळात व्यावसायिकांवर होणारी जाचक दंडात्मक कारवाई थांबवावी.गॅस पुरवठा साखळीतील अडथळे दूर करून वितरण व्यवस्था सुरळीत करावी. अशी मागणी जगदीश नरवाडे यांनी केली आहे.

# परळी रेल्वे स्टेशन ऑटो चालक-मालक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अभिमान बुक्कर यांची बिनविरोध निवड

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १३५ व्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर, परळी रेल्वे स्टेशन परिसरातील ऑटो चालक आणि मालकांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी अभिमान बुक्तर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

रेल्वे स्टेशन परिसरात पार पडलेल्या या बैठकीत आगामी जयंती उत्सव अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि सामाजिक बांधिलकी जोपासून साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला. या बैठकीत केवळ निवडीच नव्हे, तर जयंतीदिनी निघणाऱ्या मिरवणुकीचे चोख नियोजन, वाहतुकीचे नियम पाळून राखायची शिस्त आणि दरवर्षीप्रमाणे राबवण्यात येणारा भव्य अन्नदान कार्यक्रम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभिमान बुक्तर यांच्या निवडीचे सर्व ऑटो चालक बांधवांनी स्वागत केले असून परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. या प्रसंगी रघुनाथ शिरसाठ, फिरोज पिंजारी, श्रीकांत गंभीरे, सोनू कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

**नूतन कार्यकारिणी खालीलप्रमाणे:**

अध्यक्षः अभिमान बुक्तर, उपाध्यक्षः बाळासाहेब शिंदे, कोषाध्यक्षः तिरुपती वाघमारे, सल्लागार समितीः विलास गायकवाड, बाळासाहेब कांबळे, शेख बाबा (पत्रकार), संतोष मस्के. नियोजनावर सविस्तर चर्चाः

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'केदार टाईल्स अँड ग्रेनाईट' शोरूमचे भव्य उद्घाटन

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहरात बांधकाम साहित्याच्या क्षेत्रात नवे आकर्षण ठरणाऱ्या 'केदार टाईल्स & ग्रेनाईट' या भव्य शोरूमचे उद्घाटन गुढीपाडव्याच्या पावन मुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या शोरूमचे उद्घाटन मा.आ.धनंजयजी मुंडे (माजी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.ना. पंकजाताई मुंडे (पशुसंवर्धन व पर्यावरणीय बदल मंत्री, महाराष्ट्र राज्य) उपस्थित राहणार आहेत.

परळी-बीड हायवेवर पूजा मंगल कार्यालयाच्या बाजूस सुरू होणाऱ्या या शोरूममध्ये बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य एकाच छताखाली उपलब्ध




होणार आहे. येथे टाईल्स, ग्रॅनाईट, मार्बल, सॅनिटरी वेअर, सिमेंट, स्टील यांसह विविध प्रकारचे दर्जेदार बांधकाम साहित्य ग्राहकांना मिळणार आहे.

शोरूमचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे अंबाजोगाई आणि लातूरपेक्षा परवडणाऱ्या दरात दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आयोजकांचा वतीने सांगण्यात आले आहे. आकर्षक डिझाईन्सच्या टाईल्स, मजबूत सिमेंट-स्टील आणि आधुनिक सॅनिटरी वेअर यामुळे ग्राहकांना त्यांच्या स्वप्नातील घरासाठी लागणारी सर्व सामग्री येथे सहज मिळणार आहे.


भव्य शोरूम, नवीन डिझाईन्स आणि खात्रीशीर दर्जा हीच 'केदार टाईल्स & ग्रेनाईट'ची ओळख ठरणार असून परिसरातील ग्राहकांनी एकदा नक्की भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : 9527079555 / 9049727338 / 7972270636.

# अभिनेत्री दिपिका कक्कड भावूक, आरोग्याविषयी व्यक्त केली चिंता

टेलिव्हिजनची लोकप्रिय अभिनेत्री दीपिका कक्कड हिला २०२५ मध्ये आपल्याला कॅन्सर असल्याचे समजले. नुकताच यासंबधित तीची एक सर्जरी पार पाडली आहे.

दरम्यान अभिनेत्री दीपिकाआणि पति शोएब इब्राहिम सोशल मिडियावर सक्रिय असून ते आपल्या ब्लॉगच्या माध्यमातून दीपिकाच्या फॅन्सना तिच्या आरोग्याबाबत माहिती देत असतात. नुकताच आपल्या एका ब्लॉगमध्ये दीपिकानं तिच्या आरोग्याबाबतची माहिती फॅन्ससोबत शेअर केली आहे. यावेळी तिने सांगितलं आहे की या आजारामुळे तिला भूख लागत नाही. तसेच, यावेळी ती योग्य तो आहार घेत असून या आजारामुळे तिला सतत थकवा जाणवत आहे. या आजारामुळे तिला मानसिक ताण येत असल्याचं सांगत दिपिका भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. दिपिकानं तिच्या



आरोग्याविषयी चिंता व्यक्त करत या ब्लॉगमध्ये बोलताना पुढे सगळं व्यवस्थित होवो अशी आशा दीपिकानं व्यक्त केली आहे.

# मराठी कलाविश्वाचा सन्मान सोहळा; दिमाखात रंगला 'चिरायू २०२६'

■ मुंबई : वृत्तसंस्था

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी आपण सगळेच सज्ज झाले आहोत. येत्या गुढीपाडव्याचं औचित्य साधत 'शेलार मामा फाउंडेशन' आयोजित 'चिरायू २०२६' हा कलाकारांच्या सन्मानाचा आणि नात्यांच्या उत्सवाचा सोहळा मोठ्या दिमाखात आणि उत्साहात संपन्न झाला. अवघं मराठी कलाविश्व यानिमित्ताने एकवटलं होतं. नवनवे संकल्प आणि कार्य-प्रकल्पांसोबत मनोरंजनाची गुढी उभारत मराठी नववर्षाचं स्वागत 'चिरायू'तर्फे दणक्यात साजरं केलं जातं. शेलार मामा फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'चिरायू'चे वैशिष्ट्य म्हणजे अभिनव संकल्पनांच्या माध्यमातून 'चिरायू' सतत वेगळा आणि सकारात्मक संदेश देत असते. तसेच नवोन्मेषाच्या आनंदासोबतच पडद्यामागे राबणाऱ्या कलाकर्मींची दखल 'चिरायू'च्या मंचावर घेतली जाते.

यंदा चिरायू च्या मंचावर 'बीज गुढी'ची अनोखी संकल्पना साकारण्यात आली. गोधड्यांमध्ये बियांचा वापर करत ही गुढी तयार करण्यात आली. उभारलेली ही 'बीज गुढी' केवळ परंपरेचे प्रतीक न राहता निसर्गाशी नाते जपण्याची प्रेरणा देणारी ठरली. या बियांमधून भविष्यात झाडे उगवून हरित पर्यावरण घडवण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. परंपरा आणि पर्यावरण यांची



सांगड घालत हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणात हा सोहळा दिमाखात रंगला.२००६ पासून 'शेलार मामा फाउंडेशन'च्या माध्यमातून हा सन्मान सोहळा सातत्याने आयोजित केला जात आहे.

मराठी कलाक्षेत्र हे प्रयोगशीलतेसोबतच समाजाभिमुखतेसाठीही ओळखले जाते. सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत 'चिरायू' उपक्रम राबवला जातो. यंदा क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कार्याबद्दल अभिनेता सुयश टिळक याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुरस्कृत 'पर्यावरण स्नेही' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पडद्यामागील कलाकारांमध्ये वेशभूषेसाठी राहुली नागरे, चित्रपट पोस्टर डिझायनिंग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सचिन गुरव, तर चित्रपट प्रसिद्धी-जनसंपर्क क्षेत्रातील कार्याबद्दल गणेश गारगोटे यांचा सन्मान करण्यात आला. त्यासोबत मेकअप आर्टिस्ट संतोष गिलबिले, आणि डबिंग आर्टिस्ट अभिनेता मंगेश सातपुते यांनाही याप्रसंगी गौरविण्यात आले. अमृता राव, सुजय डहाके, भार्गव जगताप, श्रीनिवास पोकळे, त्रिशा ठोसर, कबीर खंदारे या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त विजेत्या मान्यवरांचा विशेष सन्मानही यावेळी करण्यात आला. या सोहळ्यात 'शेलार मामा फाउंडेशन'चे सुशांत शेलार यांनी माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे विशेष आभार मानले. तसेच खासदार श्रीकांत शिंदे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम , सर्व मान्यवर, कलाकार आणि तंत्रज्ञांचे आभार मानत संस्थेचा उद्देश स्पष्ट केला. "समाजासाठी आणि कलेसाठी मनापासून काम करणाऱ्या व्यक्तींना योग्य व्यासपीठ देऊन त्यांचा गौरव करणे आणि त्यांच्या कार्याची दखल घेणे, हा आमचा खरा हेतू आहे," असे सांगत त्यांनी उपस्थित सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. "मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टांमुळेच आपल्या जीवनात खरी समृद्धी येते. त्यांच्या आयुष्यात आनंद फुलू दे आणि सुगीचे दिवस येऊ दे,' अशी भावनाही सुशांत शेलार यांनी यावेळी व्यक्त केली.

दिग्दर्शक संजय जाधव, सचित पाटील, अवधूत गुप्ते, स्वप्नील बांदोडकर, दिग्दर्शक समित कक्कड,श्रुती मराठे, गौरव घाटणेकर, स्मिता गोंदकर, पुष्कर जोग, योगेश शिरसाट, जान्हवी किल्लेदार, राधा सागर, निर्मात्या अमृता राव, रणजित जोग, अक्षया गुरव, अक्षता नाईक, संजना पाटील, मंगेश सातपुते, संगीतकार अजित परब, त्रिशा ठोसर, भार्गव जगताप, गीतकार मंदार चोळकर आदि कलाकार यावेळी उपस्थित होते. कला, संस्कृती, समाजसेवा यांचा गौरव करणारा आणि मान्यवरांची उपस्थिती, कलाकारांचा उत्साह, रसिकांचा भरभरून प्रतिसाद यामुळे 'चिरायू २०२६' सोहळा अविस्मरणीय ठरला.